म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२६३



# भजनसंग्रह.

## पुस्तक दुसरें.

REFBK-0020253
REFBK-0020253

संग्रहकर्ता
रावजी जनार्दन भिडे.

८९३२
२२५८५
सन - १९१८.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
...तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,

॥ श्री ॥

# भजनसंग्रह.

## पुस्तक दुसरें.

ग्वाल्हेर येथें सरकारांत होणाऱ्या भजन सप्त्यांत म्हणण्यासाठीं तयार केलें.

REFBK-0020253

संग्रहकर्ता
...वजी जनार्दन भिडे.

सन १९१८ इसवी.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पान |
|---|---|
| प्रस्तावना | |
| भजनावली ... ... ... ... | १–२ |

भाग पहिला.

| | |
|---|---|
| मराठी पदावली ... ... ... ... | ३–१७ |

भाग दुसरा.

| | |
|---|---|
| हिंदी-पदावली ... ... ... ... | १७–३२ |

भाग तिसरा.

| | |
|---|---|
| अभंग ... ... ... ... ... | ३३–३५ |

भाग चौथा.

| | |
|---|---|
| संकीर्ण पदावली ... ... ... ... | ३६-४० |


## चुकीची दुरुस्ती

मराठी पद ८ यांत तिसरें कडव चुकून राहिलें तें खालीं लिहि ल्याप्रमाणें वाचावें—

मुनी तापसी ज्ञानी याजी । शूरवीर रावणसे गाजी ।
अंतीं एक हि नाहीं उरला । काय भुल पडली, प्राण्या
काय भुल पडली ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
का. क्र. २०२५३
८८९३२ ३।८।५१ ३९८ १११०२

# प्रस्तावना

ग्वाल्हेर येथें सरकारांत होणाऱ्या भजनसप्त्यांत म्हणण्यासाठीं "भजनसंग्रह" या नांवाचें एक पुस्तक मीं संवत्सर प्रतिपदा शके १८४६ ( ता. ५ एप्रिल १९२४ इ. ) या सुमुहूर्तावर छापविलें. कारणावांचून कार्य नाहीं. सदरहू सत्कार्यास वैकुंठवासी चिरस्मरणीय **श्रीमन्माधवमहाराज शिंदे आलीजाबहादुर** हे कसे कारणीभूत झाले याचें वर्णन त्या पुस्तकाचे प्रस्तावनेंत केलें आहे. त्यानंतर एकच भजनसप्ता महाराज विद्यमान असतां झाला. दुसरे सप्त्यापूर्वी त्यांची अवतार-समाप्ती झाली. त्यांनीं आजन्म केलेल्या हजारों सत्कृत्यांचें व विशेषतः त्यांनीं आमरणांत चालविलेल्या भजनसप्त्याचें फळ श्री गोपाळकृष्ण महाराजांनीं त्यांच्या आत्म्यास निःसंशय दिलें असेल. पण ग्वाल्हेरच्या राजघराण्यास व प्रजाजनांस मात्र तो प्रसंग एक वज्रपातसा जाणवला व कांहीं काळपावेतों सर्वांचीं मनें गांगरून गेलीं व चिंताकुल झालीं. त्यावेळच्या हृदयद्रावक स्थितीचें चित्र प्रस्तुत पुस्तकांतील संकीर्ण भाग पद ६, यांत पहावयास मिळेल. पण पुण्यवंताची पुण्याई त्याचेबरोबर संपत नाहीं. **श्रीमंत माधवमहाराजांचा** पुण्यसंचय इतका अथांग होता व त्यांनीं पुढील पिढीसाठीं इतकें विस्तीर्ण मार्गदर्शक लेखन आपल्या मागें ठेवलें आहे कीं लवकरच स्थिरस्थावर होऊन राज्याचीं कामें पूर्ववत् त्यांच्या इच्छेप्रमाणें चालूं झालीं. त्याबरोबर प्रतिवार्षिक भजनसप्ता ही चालूं झाला याबद्दलचें समाधान खालील कडव्यांत मीं व्यक्त केलें:—

**माधवभूपें** भक्ती केली । **जिवाजिरूपें** उदया आली ।
परंपरा ती पुढति चालली । वांछित नुरलें याहुनी ॥

खरोखर आमचे हल्लींचे महाराज "आत्मा वै पुत्र नामाऽसि" या शास्त्रवचनाप्रमाणें अक्षरशः निपजले आहेत. तीर्थरूपांप्रमाणें एक पहारा

स्वतःकडे घेऊन त्याची बेमालुम संपादणी आतांपासून ते करूं लागले आहेत. धन्य **श्रीमन्माधव महाराज**! धन्य **श्रीमंत जिवाजीराव महाराज**! धन्य शिंदे राजकुल! त्रिवार धन्य ग्वाल्हेर राज्य कीं ज्यास भगवद्भक्त अधिपतींची मालिका लाभली आहे!!! असो.

पूर्वीच्या "भजनसंग्रहा" चे प्रस्तावनेंत खालील वाक्य आहेः—

"अद्याप नवीं नवीं भजनें पैदा करण्याचा क्रम थांबला नाहीं. तथापि तयार असलेला संग्रह इतका मोठा आहे कीं तो स्वतःचे व साथ करणाऱ्या मंडळींचे सोईसाठीं व इतर जिज्ञासु लोकांच्या उपयोगासाठीं छापून काढणें अवश्य झालें आहे."

तेव्हांपासून आजपावेतों जवळजवळ आणखी १०० पदांचा संग्रह तयार झाला, त्याचें हें दुसरें पुस्तक छापविण्याचा हा सुयोग आला आहे. पहिल्या पुस्तकाप्रमाणेंच हेंही फुकट वांटण्यासाठीं छापविलें आहे. आशा आहे कीं पहिल्या पुस्तकाप्रमाणें हें पुस्तक ही भजनप्रेमी जनांस आवडेल व तद्द्वारा त्यांची भजनप्रवृत्ति अंशतः तरी वृद्धिंगत होईल.

येथें एक प्रश्न उद्भवेल कीं एवढ्याशा संग्रहास साडेचार वर्षांचा दीर्घ काळ कशास पाहिजे होता? आपला हा देश भक्तिप्रधान असल्यानें भजनवाङ्मयास तोटा नाहीं. श्रीज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, कबीर, तुलसीदास, सूरदास, मीराबाई इत्यादि पूर्व कालच्या संतकवींपासून आधुनिक कवनकारांपावेतों अनेकांनीं भगवद्भक्तिपर केलेल्या पदांचें भांडार इतकें मोठें आहे कीं त्यांतून मनांत येतांच अल्पावधींत वाटेल तेवढा संग्रह सहज करतां येईल. कारण ज्या कवनावर भगवन्नामाची मोहोर असेल तें प्रत्येक संग्रहणीय असणार हें उघड आहे, त्यांत आवडानिवडीस जागा च नाहीं. याच भावार्थाचा खालील श्लोक श्रीहरिभक्तिपरायण हरिबोवा ह्यांनीं केलेल्या "भक्तिरसायण" या श्रीमद्भागताच्या दशमस्कंदावरील संस्कृत काव्यांत आरंभीं कवीनें योजिला आहेः—

" सौभाग्यास्पदमेव वस्तु महिलाभालेषु चेत् कुंकुमम् ।
सौभाग्यप्रतिपादनाय तदलं किं तत्र भूषान्तरैः ।
एवं मत्कविताप्रगल्भवनितासौभाग्यसंधायकम् ।
नित्यं श्रीपतिभूषणं विजयते न्यास्तां नवालंकृतिः ॥

( अर्थः– स्त्रीच्या भालप्रदेशावरील कुंकू हें एकच चिन्ह सौभाग्यद्योतनासाठीं पुरें आहे. इतर आभूषणें असोत किंवा नसोत, त्यांचें कांहीं महत्त्व नाहीं. तद्वत् माझी कविता हीच कोणी प्रौढ स्त्री, तिचें सौभाग्य श्रीपतीचे नांवांत आहे, इतर दागदागिन्यांचें–पक्षीं काव्यालंकारांचें–प्रयोजन नाहीं. )

या दृष्टीनें पाहिलें तर भगवन्नामांकित प्रत्येक कवन ' भजन संग्रहांत' स्थान पावण्यास पात्र आहे यांत संशय नाहीं.

हें सर्व खरें, पण प्रस्तुत संग्रहाचा हेतु स्वतःस व इतरांस भजनाची गोडी लावण्याचा असल्यानें मनोरंजकत्वाकडे लक्ष्य देणें अवश्य झालें. एकादा पदार्थ शरीरास पथ्यकर व पुष्टिकर असला तरी तो चमचमीत व खुसखुशीत असल्यावांचून खाणाराचे तोंडास पाणी सुटत नाहीं व तो हौसेनें खाववत नाहीं. औषध हितकर खरें, पण तूपसाखरेच्या अनुपानाशिवाय घशाखालीं उतरवत नाहीं. रत्न स्वतः किती ही मौल्यवान असलें तरी जोंपावेतों सुंदरशा कोंदणांत बसविलें गेलें नाहीं तोंपावेतों त्यावर दृष्टी खिळत नाहीं व तें अंगावर धारण करण्यास योग्य होत नाहीं. त्याप्रमाणें भगवन्नाम कल्याणप्रद व मोक्षदायक खरें, पण त्यास ताल, सूर, रागदारी व वाद्यांची व म्हणणारांची साथ, इत्यादि बाह्यांगांची व शब्दचमत्कार, अर्थगांभीर्य, कल्पनाचातुर्य व रचनासौष्ठव, इत्यादि अंतरंगांचीं जोड असल्यावांचून भगवद्भजनाकडे चित्त वेधलें जात नाहीं. एका वेश्यासक्त मनुष्याची गोष्ट आहे कीं एका साधूनें त्यास प्रथम त्या वेश्येचेंच ध्यान धरावयास लावून मग क्रमाक्रमानें त्याच आकृतीवर मुकुट, धनुष्यबाण, केशरी तिलक, पीतवसन, इत्यादि कल्पून शेवटीं प्रभु

श्रीरामचंद्राचें स्वरूप ध्यानांत आणावयास शिकविलें. तद्वत् मानवाची ओढ स्वभावतः मनोरंजनाकडे असल्यानें मनोरंजनापासून सुरवात करून क्रमाक्रमानें सगुणभक्तीचें निर्भेळ तत्त्व त्याचे अंतःकरणांत उतरवीत उतरवीत शेवटीं " पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृतीं स्वपनीं पांडुरंग ॥ " अशा तन्मय स्थितीपावेतों पोंचविणें हीच एक या नास्तिकपणाच्या व धर्मग्लानीच्या काळांत बिनतोड युक्ति आहे. एका पदाचें ध्रुवपद " कलियुगीं साधन नाम चि सार " असें आहे. पण या साधनास ही एक साधन लागतें, तें मनोरंजन हें होय. ही गोष्ट लक्ष्यांत आणून पूर्वींच्या व या संग्रहांत अशींच भजनें निवडण्याचा प्रयत्न केला आहे कीं ज्यांत कांहीं ना कांहीं मनास आकर्षित करण्याचा गुण आहे. कोणांत पदलालित्य, कोणांत अनुप्रासांची मौज, कोणांत अर्थगांभीर्य, कोणांत रसपरिपोष, कोणांत विलक्षण कल्पना, कोणांत हृद्यंगम काव्यालंकार, कोणांत तें म्हणण्याच्या चालीची कर्णमधुरता व परिणामक्षमता असा कांहीं ना कांहीं विशेष या संग्रहांतील प्रत्येक पदांत सांपडेल. तो वाचकांच्या सहज लक्ष्यांत येण्याजोगा असल्यानें या ठिकाणीं फक्त कांहीं विशिष्ट पदांचा उल्लेख करणें पुरें.

मराठी पद २– हें पद माझे परमपूज्य प्रातःस्मरणीय पितामह तीर्थरूप त्रिंबक अनंत ऊर्फ दादासाहेब भिडे यांचें आहे. पहिल्या पुस्तकांत यांच्या विषयींची माहिती प्रस्तावनेंत देऊन त्यांचीं सुमारें पंचवीस पदें सदरहू संग्रहांत समाविष्ट केलीं आहेत. त्यावरून त्यांचें साधुत्व व कवित्व कशा कोटीचें होतें याची कल्पना होईल. प्रस्तुत पद त्यांच्या च हस्तलिखित वहींतून घेतलें आहे. या पदांतील बाणेदारपणा अवर्णनीय आहे. अलीकडे महात्मा गांधींनीं राजकीय बाबतींत सत्याग्रहाचा नवीन उपाय शोधून काढला आहे. त्याच प्रकारचा सत्याग्रह पारमार्थिक ध्येयप्राप्तीसाठीं कसा करावा हे या पदांत वर्णिलें आहे.

आधुनिक कविवर्गांत श्रेष्ठ स्थान पावलेले रा. भास्करराव तांबे हल्लीं ग्वाल्हेर सरकारचे नोकरींत आहेत, त्यांनीं रचिलेलीं पुढील पदें

यां संग्रहांत घेतलीं आहेतः— ( १ ) मराठी पदें ३, १२, व १६ ( २ ) हिंदी पद २१, ( ३ ) संकीर्ण भाग, पद ७.

हीं सर्वच प्रतिभायुक्त आहेत. मराठी पद ३ ही सान्त असून अनन्त व अनन्त असून सान्त असा जो जगज्जनकजननीरूप अर्ध–नारी–नटेश्वर त्याची आरती आहे. संकीर्ण पद ७ हें जरी स्वदेशभक्तिपर आहे तरी त्यांतील " मरणांत खरोखर जग जगतें, आधीं मरण अमरपण मग येतें " हा मानवी जीवनाचा सिद्धांत अत्यंत उदात्त कोटीचा असल्यानें व तो ऐहिक आणि पारमार्थिक पुरुषार्थास सारखाच उपयोगी असल्यानें त्याचा समावेश या संग्रहांत केला आहे.

उज्जयिनीचे अष्टेवाले यांचें घराणें गायन व सतारवादन दोन्ही-विषयीं प्रसिद्ध आहे. त्या घराण्याचे हल्लींचे पुरुष रा. रा. धुंडिराज कृष्ण उर्फ भैयासाहेब अष्टेवाले हे आहेत. आनुवंशिक गायनवादनाची विद्या यांच्यांत असणें साहजिक आहे. परंतु यांच्यांत कवित्वशक्ती ही चांगली आहे हें नुक्तेंच निदर्शनास आलें. खालील पदें त्यांचीं आहेतः—

( १ ) मराठी पदें:– ९, १८, २१, २४ ( २ ) हिंदी पदः– १

मराठी पदें ९, २१, २४ हीं सर्व ईश्वराचें सर्वव्यापित्व वर्णन करणारीं अर्थात् अद्वैतपर आहेत. पद १८ यांत भजनानंद परोपरीनें वर्णन केला आहे. हिंदी पद १ हा गजल असून यांत सृष्टींतील अनेक निरनिराळ्या प्रभावशाली पदार्थांचें प्रभावशालित्व कशांत आहे याचें वर्णन केलें असून तें वर्णन देखील प्रभावशाली आहे.

रा. ब. चिंतामण विनायक ऊर्फ नानासाहेब वैद्य हें विद्वद्रत्न अनेक वर्षें ग्वाल्हेर राज्यास लाभलें होतें. त्यांनीं नोकरींत असतांना श्रीमंत माधवमहाराज यांजवर पद रचिलें होतें तें संकीर्ण भागांत क्रमांक ९ वर दिलें आहे.

मराठी पद ७ रा. रा. देसाई, संचालक, गोपाळ गायन समाज पुणें यांजकडून मिळविलें. ते हें पद पोवाड्याच्या चालीवर म्हणजे

प्रत्येक कडव्याच्या शेवटीं " जी, जी " हें पालुपद लावून म्हणत असतात. भजनांत " जी जी " ची लांबण शोभत नाहीं सबब ती वर्ज्य करून व थोडी चाल बदलून सदरहू पद म्हणतां येतें. पदाची जुळणी फार बहारदार आहे.

बरींच पदें सत्याग्रहाश्रमाच्या ' आश्रमभजनावलीं'तून घेतलीं आहेत. कांहीं गांधर्व महाविद्यालयांच्या पदावलींतून घेतलीं आहेत. ज्यांच्या शेवटच्या चरणांत ' ब्रह्मानंद ' हें नांव आलें आहे तीं पुष्करचे ब्रह्मानंद-स्वामी यांच्या भजनमालेंतून घेतलीं आहेत.

या सर्व कर्त्यांचा मी अंतःकरणपूर्वक आभारी आहें.

शेवटीं स्वकृतीचा ही उल्लेख करावासा वाटतो, पण तो आत्मप्रौढी-करितां नसून उत्कट स्फूर्तिदायक प्रसंगावर माझ्या सारख्याला सुद्धां बरी वाईट पद्यरचना कशी स्फुरते येवढें दाखविण्यासाठीं करतों. तथापि विस्तारभयास्तव ते प्रसंग कोणते याविषयीं पाल्हाळ न करतां फक्त स्वकृती कोणती हें खालीं दर्शवितोंः–

( १ ) मराठी पद. ८ ( २ ) संकीर्ण पद. ६ ( ३ ) मराठी पदें ५, ७, १५, व २५ या प्रत्येकांतील शेवटचें कडवें.

पहिल्या पुस्तकांतील प्रस्तावनेचा उपसंहार पुढीलप्रमाणें केला होता, त्यानें च ही प्रस्तावना समाप्त करतोंः–

" सरते शेवटीं या सत्कार्याचा प्रेरक श्रीपांडुरंग त्याचे चरणारविंदीं प्रणतींची लाखोली वाहून व त्यास कारणीभूत झालेले " माधवांश " असे **श्रीमन्महाराज माधवराव शिंदे** यांच्या उपकृतींचा आभारपूर्वक पुन्हां उल्लेख करून व माझें अवशिष्ट आयुष्य असें च आनंदमय करून अंतीं आपले चरणांजवळ आश्रय द्यावा असा वर परमेश्वराजवळ अनन्य भावानं मागून ही बरीच लांबलेली प्रस्तावना पुरी करतों. "

मिति भाद्रपद शुद्ध ४ शके १८५०<br>ता. १७ सप्टेंबर १९२८ इ.

संग्रहकर्ता,<br>रावजी जनार्दन भिडे.

## भाग १ ला.

### मराठी पदावली.–[ संख्या २७ ]


| अ. नं. | पदारंभ | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | अन्य कामना ... | ३ |
| २ | आग्रह हा ज्याला ... | ३ |
| ३ | आरती त्रिभुवन ... | ४ |
| ४ | काय हरि मायेची ... | ५ |
| ५ | कुणि दावा नयनीं ... | ५ |
| ६ | कैवारी हनुमान ... | ६ |
| ७ | गणपती गौरी नंदना | ६ |
| ८ | जा जा तूं शरण ... | ७ |
| ९ | जो देह न गेह न ... | ७ |
| १० | तो भला भला ... | ८ |
| ११ | दीनाला मज दीनदयाळा | ९ |
| १२ | ध्याइन कां मी ... | १० |
| १३ | नियम पाळावे ... | १० |
| १४ | पांडुरंग श्रीरंग ... | ११ |
| १५ | पाहिन कधीं मी ... | ११ |
| १६ | पूजन व्हावें हरि ... | ११ |
| १७ | प्रभुवीण संकट ... | १२ |
| १८ | भजन करणें कुठें ... | १२ |
| १९ | मायेचा व्याप सारा... | १३ |
| २० | श्री दशरथसुता ... | १३ |
| २१ | श्री सर्वेशा जगद्विलासा | १३ |
| २२ | श्री रामचंद्र चरणासि | १५ |
| २३ | सकळ कळे हरिलीला | १५ |
| २४ | सच्चित्सुख हरि ... | १५ |
| २५ | सोड सोड सोड ... | १६ |
| २६ | हरये नमः हरये नमः | १७ |
| २७ | हरि तुझ्याविण न ... | १७ |


## भाग २ रा.

### हिंदी पदावली.–[ संख्या ३९ ]


| अ. नं. | पदारंभ | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | अबकी टेक हमारी ... | १७ |
| २ | आंखिया हरि दरसन | १८ |
| ३ | कर ले भजन, मनुजा | १८ |
| ४ | कुर्बान जान सुरत पे | १८ |
| ५ | गिरिधर व्रजधर ... | १९ |
| ६ | जानकिनाथ सहाय | १९ |
| ७ | जानत प्रीतरीत ... | २० |
| ८ | ठाकुर तव शरणाई ... | २० |
| ९ | डंके है त्रिभुवननाथ | २० |
| १० | तुमाबिन मोरी कौन | २१ |
| ११ | तूं है गगन विस्तीर्ण | २१ |
| १२ | दरसन देना प्रानप्रियारे | २२ |
| १३ | दीनन दुख हरन देव | २२ |
| १४ | धर्ममणि मीन मर्यादमणि | २३ |
| १५ | नजर नहीं आवे ... | २३ |
| १६ | नाम लिया हरिका ... | २४ |
| १७ | नारायण जिसके ... | २४ |
| १८ | परब्रह्म परमेश्वर ... | २४ |

| अ. नं. | पदारंभ | पृष्ठ | अ. नं. | पदारंभ | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १९ | प्रभु सुन अरज ... | २५ | ३० | राम सुमर राम सुमर | २९ |
| २० | प्रभु मोरे अवगुण ... | २५ | ३१ | लिया फकीरीका बाना | २९ |
| २१ | बिनती सुनो आज ... | २५ | ३२ | शंकर महादेव देव ... | २९ |
| २२ | बिसर गई सब ... | २६ | ३३ | शिव शंकर भजन तूं | ३० |
| २३ | भज मन रामचरण | २६ | ३४ | सुमिरन कर मन ... | ३० |
| २४ | भज रघुविर श्याम ... | २७ | ३५ | सबसे उची प्रेम ... | ३१ |
| २५ | मंगल मंदिर खोलो ... | २७ | ३६ | साधो मनका मान ... | ३१ |
| २६ | मामभिरक्षय रघुकुल | २७ | ३७ | सीतापत रामराय ... | ३१ |
| २७ | रघुविर तुमको मेरी ... | २८ | ३८ | हरि तुम भक्तनके ... | ३२ |
| २८ | रचा प्रभू तूने यह ... | २८ | ३९ | हरि नाम जपौ ... | ३२ |
| २९ | राधे कृष्ण बोल ... | २८ | | | |


## भाग ३ रा.

### अभंग.–[ संख्या ११ ]


| अ. नं. | पदारंभ | पृष्ठ | अ. नं. | पदारंभ | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १ | आणिक दुसरें मज ... | ३३ | ७ | न कळे तें कळों येईल | ३४ |
| २ | आतां कांहीं देवा ... | ३३ | ८ | नाहीं संतपण मिळत | ३५ |
| ३ | क्षीर सागरांत ... | ३३ | ९ | पळसी तूं तरी नाम ... | ३५ |
| ४ | चक्रवाक पक्षी ... | ३४ | १० | बाळ मायेवीण ... | ३५ |
| ५ | चित्त शुद्ध तरी ... | ३४ | ११ | दुजी पंढरी पंढरी ... | ३५ |
| ६ | धरिला पंढरिचा चोर | ३४ | | | |


## भाग ४ था.

### संकीर्ण पदावली.–[ संख्या ९ ]


| अ. नं. | पदारंभ | पृष्ठ | अ. नं. | पदारंभ | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १ | उसीका देना तो दिल | ३६ | ६ | मधुर तव वाणी ... | ३८ |
| २ | तुमि बंधु तुमि नाथ | ३७ | ७ | मरणांत खरोखर ... | ३९ |
| ३ | दीनानाथ रमापति ... | ३७ | ८ | वैष्णव जन तो ... | ३९ |
| ४ | देखले नजरोंसे ... | ३७ | ९ | शशी शेखर कोटेश्वर | ४० |
| ५ | धांव धांव गा ... | ३८ | | | |

॥ श्री ॥

# भजनावली.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
20253

१ जय मुकुंद मुर-अरि गोविंद । आनंदकंद हरि गोविंद । जय मुकुंद, जय मुरारि, जय गोविंद ॥

---

२ गजानना रे गजानना । गौरिनंदना गजानना ॥

---

३ सांब सदाशिव सांब सदाशिव । सांब सदाशिव सांब शिवा । हर हर हर हर सांब सदाशिव । सांब सदाशिव सांब शिवा ॥

---

४ हरे राम हरे राम, राम राम हरे हरे । हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ॥

---

५ जय नारायण, हरि नारायण । नारायण जय जय नारायण ॥

---

६ राधे राधे राधे मुकुंद मुरारी । वाजवितो वेणू कान्हा सावळा श्रीहरी ॥

---

७ राजाराम राम राम सिताराम राम राम ॥

---

८ अगाडी चले रामराजा, पिछाडी संतनकी फौजा ॥

---

९ रामकृष्ण हरी हरी । दीना मज तारी । दीना मज तारी, तारी, तारी ॥

---

१० अखंड हरि हरि भजारे बापानो। अखंड हरि हरि भजा रे॥

११ मृदंग वाजे, वीणा वाजे, झांज वाजे झणाणा।
हरिनामाचा गजर होतो राम कांहो म्हणाना॥

१२ सावळिया राधारमणा, गोपीरमणा। कां नये
दिनाची करुणा। श्रीहरी, हरी श्रीहरी॥

१३ प्रभु एक जगतीं त्राता, सकलांसी आश्रयदाता॥

१४ शिवहर शंकर गौरीशं, वंदे गंगाधरमीशं॥

१५ राम लक्ष्मण, भरत शत्रुघन, राम लक्ष्मण जानकी।
जय बोलो हनुमान की॥

१६ राम भज राम भज राम भजरे मना। होय जनम सुफल,
जाय जम यातना॥

॥ श्री ॥

# मराठी पदावली.

## पद १ लें.

अन्य कामना मना न कधिं हि तूं धरीं ।
देउनी तिला तिलांबु शांतिला वरीं ॥ ध्रु० ॥
होशि कामदास का मदास पावुनी ।
कामदास गुरुपदास शरण जाउनी ।
रघुललाम रामनाम सतत गाउनी
होइं धन्य, मुक्तिजन्य सुख तुझ्या करीं ॥ १ ॥
ज्यांत कामनक्रचक्रशक्र वसतसे ।
तरुनि जाति भवनदीन पीनमीनसे ।
ज्यांस कुमतिपर्व गर्व खर्व ही नसे ।
हो विरक्त भक्त सक्त त्यांसि घडीभरी ॥ २ ॥
अदयहृदय नरवरा न सेविं तूं कदा ।
कधिं न होय तुष्ट, दुष्ट, रुष्ट तो सदा ।
अवन करुनि तव न करिल दूर आपदा ।
त्यजुनि इतर कारभार जवळ हरि करीं ॥ ३ ॥

## पद २ रें.

आग्रह हा ज्याला, देव सुलभ त्याला ॥ ध्रु० ॥
सत् शास्त्रें पाहिन, सत्संगें राहिन, अभ्यासें निश्चल झाला ॥ १ ॥
इंद्रियां दमिन, चित्ता नेमिन, त्यागिन विषय विषाला ॥ २ ॥
सायास करिन, सद्गुरु वरिन, लाहिन आत्मसुखाला ॥ ३ ॥
देहबुद्धि गाळिन, भेदासि टाळिन, त्र्यंबकें निग्रह केला ॥ ४ ॥

## पद ( आरती )—३ रें.

आरती त्रिभुवन जनकांची । अर्ध-नर-नारि नटेशांची ॥ ध्रु० ॥
झळके पुरुष अर्धभागीं ।
लखलखे नारी अर्धांगीं ।
सीमा ऐक्याची संगीं ।
कोटिरति मदन, मनोरम वदन लाजतिल बघुन ।
खपेना आड शरीरांची । जयजय सान्त अनन्ताची ॥ १ ॥
अपर्णा तुजविण नीरस ती ।
प्रस्तर पार्वतीच गमती ।
ज्योतिविण दिवटी मग नुसती ।
तूं हि तिजवीण, शरिरगुण हीन, शून्यरस भिन्न ।
काय गति तुझिया प्रेमाची । जय जय सान्त अनन्ताची ॥ २ ॥
अंबिका लाभतांचि संगा ।
प्रसवे खळखळ भवगंगा ।
अनंग हि येई मग रंगा ।
सूर्य झळझळति चंद्र लखलखति, उडूलुकलुकति ।
रम्यता भाजनप्रेमाची । जय जय सास्त अनन्ताची ॥ ३ ॥
मंदिर नक्षत्रीं जडलें ।
रविशशि झुंबर लोंबविले ।
सीमा सौंदर्या न मिळे ।
तूं च शशिसूर्य, तूं च सौंदर्य, मंदिर हि दिव्य ।
रूपें लीला ही ज्याची । जय जय सान्त अनन्ताची ॥ ४ ॥
नील मणिरचित तबकिं गगनीं ।
निरांजन रविशशि पाजळुनी ।
ओवांळिते सृष्टिरमणी ।

झांज झंझणण, वायु दंदणण, नगारा ही घन।
भास्कर भक्ति तुझी याची। जय जय सान्त अनन्ताची ॥ ५ ॥

## पद ४ थें.

काय हरी मायेची लीला। शंभु स्वयंभु स्वभू पाहुनि भ्रमले मनिं
इजला ॥ ध्रु० ॥
बीज कल्पना मनिं स्फुरतां। शाखापल्लवपुष्पफलांसह विश्वविटप
उठला ॥ १ ॥
बाग बहुरंगी बघुनि भुलला। विषयछंद लागला जिवाला निजानंद
भुलला ॥ २ ॥
( चाल ) या चक्षुबाहुल्यांमधें विश्व खेळतें।
लावितां उघडितां लय उत्पत्ति होते।
एकत्र ठेवितां द्वैत सकळ नासतें।
जें स्वरूप तुमचें तुम्हां प्रकट भासतें।
पहावा ब्रह्मीचा सोहळा। सच्चिद्घन बलवंत श्रीहरि सर्व ठायिं
भरला ॥ ३ ॥

## पद ५ वें.

कुणि दावा नयनीं कंसारी। संसारीं अजि सुख वाटेना ॥ ध्रु० ॥
सुभग तनू धन विपुल जयाघरीं। म्हणती योग्य तयासी जन हे।
जोंवरि ललनासुख हें तोंवरी। माया पाझर आटेना ॥ १ ॥
दुष्पूरोदर भरणासाठीं। कुठवर मत्त जनांसि नमावें।
आशा धरुनि प्रवासीं फिरतां। करितां श्रम धन साठेना ॥ २ ॥
बालवया खेळुनि घालविलें। तारुण्यीं विषयासी लंपट।
वृद्धदशा आली परि हें मन। मिथ्या मानुनि हाटेना ॥ ३ ॥
श्रमलों दमलों भ्रमलों चुकलों। आलों शरण प्रभो तव पाया।
दास म्हणुनि करुणा करिं देवा। तापत्रय मज सहावेना ॥ ४ ॥

## पद ६ वें.

कैवारी हनुमान । अमुचा कैवारी हनुमान ॥ ध्रु. ॥
पाठीं असतां तो जगजेठी । वरकड काय गुमान ॥ १ ॥
नित्य निरंतर भजकां रक्षी । धरोनियां अभिमान ॥ २ ॥
दासा रक्षिल हाचि भरंवसा । वदतसें त्याची आण ॥ ३ ॥

## पद ७ वें.

गणपती गौरि नंदना ३ । तूं सकल कलांचा निधि
मति द्यावी कवना ॥ १ ॥
मज नाहिं काव्य कल्पना ३ । दे स्फूर्ति शब्द भांडार उघडि
करि करुणा ॥ २ ॥
व्याकरण वृत्तदर्पणा ३ । स्वर छंद यमक पढवावे
मज अज्ञाना ॥ ३ ॥
मी अधीर झालों गाना ३ । ठेउनी सिद्ध साहित्य
करितों प्रार्थना ॥ ४ ॥
डफ दिमडि झांझ झणणणा ३ । झणत्कार होतसे जणुं कां
शारदेचा वीणा ॥ ५ ॥
स्वर मधुर ऐकुनि कर्णा ३ । पातले सभाजन गर्दि
जाहली स्थाना ॥ ६ ॥
मी अनन्य तुजप्रति शरणा ३ । व्हावें प्रसन्न बैसा हृदयिं
काव्य करि स्फुरणा ॥ ७ ॥
अभिमान नाहिं मीपणा ३ । तूं गाता गावविता गायक
विद्यारमणा ॥ ८ ॥
ऐकुनियां करुणा वचना ३ । गणराज उभे पाठिशीं
देत अभय वचना ॥ ९ ॥

गंधर्व यक्ष अस्माना ३ । ठाकलें सर्व त्रैलोक्य
उभे जन श्रवणा ॥ १० ॥
हे बोल स्फूर्तिचे जाणा ३ । घ्या गोड मानुनी
हीच विनंती चरणा ॥ ११ ॥
मागणें आणिक गजवदना ३ । दे सकल तुझ्यापाशीं
जें जिवाजि महाराजांना ॥ १२ ॥

## पद ८ वें.

जा जा जा तूं शरण हरीला । काय भुल पडली प्राण्या काय
भुल पडली ॥ ध्रु० ॥
माझें माझें म्हणसी जें जें । सोडुनि जाइल सर्व हि तें तें ।
अंतीं कोणि न येइल कामा । काय भुल पडली, प्राण्या काय
भुल पडली ॥ १ ॥
दो दिवसांची तनु हे साची । तिजवर सत्ता यम राजाची ।
अंतीं जाशिल गड्या एकला । काय भुल पडली, प्राण्या काय
भुल पडली ॥ २ ॥
हरिचें नाम सदा सुखदायक । अखिल संकटीं होय सहायक ।
अंतीं नेइल तुज मोक्षाला । काय भुल पडली, प्राण्या काय
भुल पडली ॥ ३ ॥

## पद ९ वें.

जो देह न गेह न देश न विश्व न काल न तो श्रीराम ।
निजभक्तांसाठीं अनेक रूपें धरि तो आत्माराम ॥ ध्रु० ॥
( चाल )-आकाश जया व्यापीना । ज्या पवन मुळीं हलवीना ।
ज्या अग्नि कधीं जाळीना । ज्या जल ही बुडवुं शकेना ।
जो धरेस कधिं धरवेना । ज्या अनंत ही वदवेना ।
तो हरी स्वभक्तां करीं धरी त्या करी त्वरित निष्काम ॥ १ ॥

तो ध्याता-ध्यान-ध्येय न द्रष्टा-दर्शन-दृश्य न राम ।
जरि गगन न पवन न दहन न उदक न भुवन न तरि तो राम।
( चाल )-निजभक्तांसी गुज बोले । त्यांच्यांत मिळुनियां खेळे ।
तत्पाप पुण्यही जाळे । आणि अहंकृतीला गाळे ।
मग भक्तां पाहुनि डोले । ज्ञानाचे देउनि डोळे ।
तो भक्ता करि भवपार पुरवुनी सकल तयाचा काम ॥ २ ॥
तो राम जगद्विश्राम करी निजभक्तासाठीं काम ।
तो तूर्यातीत प्राणविसावा सदा नमावा राम ।
(चाल)-ज्यामाधिं अहंकृति शिरेचिना । यच्चिंतन बुद्धिस होईना ।
यन्निश्चय बुद्धिस होईना । जो नये शोधितां चपल मना ।
ज्या अंतःकरण हि म्हणवेना । जो कळे न त्याच्या कृपेविना ।
सच्चिदानंद तन्नाम तयाचें यश गायन करि साम ॥ ३ ॥

## पद १० वें.

तो भला भला, भला भलारे । प्रपंच साधुनि परमार्थाचा
लाहो जेणें केला ॥ तो० ॥ ध्रु० ॥
मातापिता गणगोत बायको । आपण नामरुपांत नायको ।
श्रवणीं वेद पुराण आयको । गर्व जयाचा गेला ॥ १ ॥
संतति संपति पुष्कळ भारी । चतुर्विद्येचा कारभारी ।
परमार्थाची ध्वजा उभारी । संशय ज्याचा गेला ॥ २ ॥
अंतारं ज्ञान विरक्ति धरितो । बाहिर सोंग संपादणि करितो ।
जिवें जितें मोक्षासि वरितो । भक्तिसि फार भुकेला ॥ ३ ॥
भजनपुजन सत्पात्रीं जाणे । शिवदिन याविण कांहिंच नेणं ।
नादे उद्बोधार्थ सुखानें । केसरि गुरुचा चेला ॥ ४ ॥

## पद ११ वें.

दीनाला मज दीनदयाळा तारिशिं कधिं रामा ।
तापत्रय कधिं विलया नेशिल मम मेघश्यामा ॥ ध्रु० ॥
या भूलोकीं मम सम अन्य न पातकैकराशी ।
यास्तव पीडिल मजला घालुनि यम निजभुजपाशीं ।
सीताकांता केव्हां येइल तुज मम काकुळती ।
मजविषयीं अशि निष्ठुर धरिली रीति कशी भलती ।
अहिवरशयना सरसिजनयना श्लाघ्य सुगुणधामा ।
तापत्रय कधिं विलया नेशिल मम मेघश्यामा ॥ १ ॥
लवमात्राहि मीं सुकृत न केलें, नेलें वय वाया ।
हतभाग्यें म्यां व्यर्थ दवडिली ही मानवकाया ।
तरावया भव धरिले नाहीं बळकट गुरुचरण ।
पतितपावना झडकरि करि मम जननमरण हरण ।
करुणापांगें विलोकुनी मज नेईं निजधामा ।
तापत्रय कधिं ... ... ... ... ... ॥ २ ॥
कामक्रोधादिक षड्रिपु हे गांजिति मज भारी ।
रघुकुलतिलका ! अति दुःसह हें संकट मम वारीं ।
सांपडलों मी पुत्रकलत्रादिकममताजालीं ।
या पासुनि मज कोण सोडविल तुजविण ह्या कालीं ।
करुणासिंधो बंधो ! मुनिजनमानसविश्रामा ।
तापत्रय कधिं ... ... ... ... ... ॥ ३ ॥
तुजविण मजला कोणी नाहीं तारक या लोकीं ।
दीन वत्सला ! बुडुनी गेलों दुस्तर भवशोकीं ।
एक वेळ वद ! नारायण हा देवा ! मम आहे ।

कृपाकटाक्षें एक वेळ तरि मजला तूं पाहें।
सार्थकता तरि येइल रामा तव पावननामा।
तापत्रय कधिं ... ... ... ... ... ॥ ४ ॥

## पद १२ वें.

ध्याइन कां मी ? निशिदिनिं तुज हरी ॥ ध्रु० ॥
विकसित कमलासम फुललें मम।
सुमन तुझ्या पदिं वाहिन कां मी ॥ १ ॥
जनिं, वनिं, गगनीं, त्रिभुवनिं एका !
अनेक रूपीं पाहिन कां मी ॥ २ ॥
सुतदारा तव सत्ता समजुनि।
प्रेमीं काया झिजविन कां मी ॥ ३ ॥
अखिल कर्म या कर्मक्षेत्रीं।
पूजन मानुनि अर्पिन कां मी ॥ ४ ॥
सप्तसुरीं सुरहीन लयीं तुज।
उन्मादीं कधिं गाइन कां मी ॥ ५ ॥
विविध कवनें मम आविविध रसमय।
लाहुनि तुज कधिं नाचिन कां मी ॥ ६ ॥
प्रेषण हेतू तव संपादुनि।
कृतार्थ तव पदिं येइन कां मी ॥ ७ ॥

## पद १३ वें.

नियम पाळावे, जरि म्हणशील योगी व्हावें ॥ ध्रु. ॥
रसनेचा जो अंकित झाला, समूळ निद्रेला जो विकला।
तो नर योगाभ्यासा मुकला, असें समजावें ॥ १ ॥
रात्रीं निद्रा परिमित घ्यावी, भोजनांत ही मिती असावी।
शब्दवल्गना बहु न करावी, साधक जीवें ॥ २ ॥

यापरि सकलाहारविहारीं, नियमित व्हावें मनिं अवधारीं ।
निजरूपोन्मुख होउनि अंतरीं, चित्त मग धावें ॥ ३ ॥
विषयापासुनि वळतां वृत्ति, येइल सहजाचि आत्म्यावरती ।
जैसा निश्चळ दीप निवातीं, समाधी पावे ॥ ४ ॥

## पद १४ वें.

पांडुरंग श्रीरंग भज रे मना । भजरे मना बा भजरे मना ॥ ध्रु० ॥
अमोलिक जातें वय । आतां तरी धरीं सोय ।
असा काय मानवदेह । येइल पुन्हा ॥ १ ॥
विषयाचें सुख द्वाड । परि आहे बहु गोड ।
पुढें आहे अवघड । यम यातना ॥ २ ॥
रात्रंदिन करिसी मजा । केव्हां येइल यमराजा ।
घेउन जाईल प्राण तुझा । निजसदना ॥ ३ ॥
तुका म्हणे एक करा । हरिचरण दृढ धरा ।
चुकेल चौऱ्याशीचा फेरा । तुझिया प्राणा ॥ ४ ॥

## पद १५ वें.

पाहिन कधि मी कृष्ण कन्हैय्या । आस मनीं ही लागली ॥ ध्रु. ॥
अलख निरंजन भवभय भंजन । निज भक्तांचें जो मनरंजन ।
पूर्ण दयाघन ब्रह्म सनातन । जीव जंतुची माउली ॥ १ ॥
श्रुति ज्या गाती, स्मृति ज्या स्तविती। बायबल कुराण महिमा वानिती।
साधुवृंद ज्या प्रेमें भजती । विश्वसूत्र जो चाळवी ॥ २ ॥
माधव भूपें भक्ती केली । जिवाजिरूपें उदया आली ।
परंपरा ती पुढति चालली । वांछित नुरलें याहुनी ॥ ३ ॥

## पद १६ वें.

पूजन व्हावें हरि मम जीविन ॥ ध्रु० ॥
अभिषेकाचें पात्र शरिर हें । निर्मल शुद्ध असावें ॥ १ ॥
अभिषेकास्तव जीवन माझें । पावन विमल झरावें ॥ २ ॥

कर्में सारीं फुलें पुजेचीं । समजुनि कर्म करावें ॥ ३ ॥
श्वासोच्छ्वासहि धूप पुजेचा । हें न कधीं विसरावें ॥ ४ ॥
ज्योति जिवाची दीप पुजेचा । भावें ओवाळावें ॥ ५ ॥
नैवेद्यास्तव तन मन धन मम । ग्रास तुला अर्पावे ॥ ६ ॥
आरती व्हावी वाणी माझी । मंत्रपुष्प कीं स्तवन असावें ॥ ७ ॥
संपति, संतति, मुक्ती इतरां । हरि, मज इतुकें द्यावें ॥ ८ ॥

## पद १७ वें.

प्रभुवीण संकट कोण निवारी ॥ ध्रु० ॥
दीनसखा तरि कोण असा कीं । दुःख हरी भय वारी ॥ १ ॥
संकटसमयीं शरण रिघावें । कोण असा कैवारी ॥ २ ॥
कोण असा कीं षड्रिपु यांची । हटविल थोर सवारी ॥ ३ ॥
व्यथित जिवांना कोण सदय तो । देइल शांति मवारी ॥ ४ ॥
दास विनवितो मजवरि देवा । सोडिं कृपेचें वारी ॥ ५ ॥

## पद १८ वें.

भजन करणें, कुठें जाणें न येणें ॥ ध्रु० ॥
स्मरुनी हरिहर श्रीधर शंकर कमलादरभव भव तरणें ।
कुठें जाणें न येणें, भजन करणें ॥ १ ॥
ओलि कोरडी भाकर जी हरि, देईल त्यांत उदर भरणें ।
कुठें जाणें ... ... ॥ २ ॥
वस्त्रें साधीं वा भरजारिचीं, हरि देइल तीं पांघरणें ।
कुठें जाणें ... ... ॥ ३ ॥
भज हरि देहीं होइ विदेही, जाइल चुकुन जनन मरणें ।
कुठें जाणें ... ... ॥ ४ ॥
हरिला भजसि न मग वारें कां, सौख्यासाठीं तळमळणें ।
कुठें जाणें ... ... ॥ ५ ॥

घे हरिनामा दे मन त्या मग, तद्वैभव भोगित बसणें ।
कुठें जाणें ... ॥ ६ ॥
स्मरतां स्मरतां हरि निज वपुचा, इष्ट असेंच विसरपडणें ।
कुठें जाणें ... ॥ ७ ॥
मिथ्या मीपण ममता टाकुनि, निजरूपांत सदा रमणें ।
कुठें जाणें ... ॥ ८ ॥
धोंडू विनवी सकल जनां या, करणें जरि तरि हें करणें ।
कुठें जाणें ... ॥ ९ ॥

## पद १९ वें.

मायेचा व्याप सारा । मोहाचा हा पसारा । मी कां नेणला ॥ ध्रु ॥
सुखकोटि मायिक । कसा झालों कामुक ।
राघव श्याम सुंदर । मी कां नेणला ॥ १ ॥
सदय हृदय माझा स्वामी । कधीं नाठविला कां मी ।
रामचंद्र धनि माझा मी । कां नेणला ॥ २ ॥

## पद २० वें.

श्री दशरथ सुता भज रे अतां । निज जननचि हे वृथा,
घालविसी कां नरा साधी अपुल्या हिता ॥ ध्रु० ॥
आप्त गोत गृह धन सुत कांता । कामिं न येती भगिनी भ्राता ।
बुधस्तुता नतासि त्राता । शरणचि जाई त्यासि रे,
निज भजक अवनव्रता ॥ १ ॥

## पद २१ वें.

श्री सर्वेशा जगद्विलासा सच्चित्सुखराशी ।
खरा तूं असशी अविनाशी ॥ ध्रु० ॥
देव हि होसी भक्त हि होसी विभक्त नच असशी ।
तूंच तुज भक्तिभाग्य देसी ॥ १ ॥

( चाल ) तूं सत्ता म्हणुनी जगास थारा मिळे ।
तूं ज्ञान म्हणूनी जनास सारें कळें ।
आनंद म्हणुनि हें जगत् सुखें डोले ।
त्रैगुण्य तुझें हें त्रिभुवनिं संचरलें ।
सच्छिष्यांचें रूप धरुनियां सद्गुरु ही होसी ।
तयानां आत्मबोध करिसी ॥ २ ॥

( चाल ) तूं पिता असिसि तूं माता सुखराशी ।
पतिकांता होउनि प्रपंच चालविशी ।
तूं बंधु भगिनि होउनि माया करिसी ।
सुतकन्या होउनि गृहिं किति तरि रमसी ।
होउनि शिक्षक विद्यार्थीगण शिक्षण ही होसी ।
तूंच तुज विद्या शिकवीसी ॥ ३ ॥

( चाल ) कधिं अराजकाला उत्तेजन देसी ।
मग तया मोडण्या वीरा निर्मीसी ।
कधि स्वराज्यसत्ता नरपतिला देसी ।
कधिं प्रजेकडुनि ही स्वराज्य चालविसी ।
राजनीति तूं राजनिपुण तूं राजकारणासी ।
सुयंत्रित तूंच हालवीसी ॥ ४ ॥

( चाल ) तूं कवि रवि प्रतिभा प्रभा प्रभाव हि तूं ।
कविजलनिधि मधल्यां काव्य लहरि ही तूं ।
कविमयूर यांचें नृत्य कृत्य ही तूं ।
स्वरछंद यमक तूं नादब्रह्म ही तूं ।
धुंडिराज तूं, स्तवन कवन तूं, कृपाहि तूं असशी ।
सुखानें तूंच तुला स्तविसी ॥ ५ ॥

### पद २२ वें.

श्री रामचंद्र चरणासि शरण। जाइ भाव धरुनि भवसिंधु तरुनी।
हो ताप शमन न ये जन्म मरण॥ ध्रु०॥
भक्तासि करी जो सदा भरण। रघुवंश पद्म मणि चंडकिरण।
प्राणया जाउनि त्याचे धरि तुं चरण॥ १॥

### पद २३ वें.

सकळ कळें, हरिलीला न कळे। शास्त्र मनुज जरि
शिकला सगळें॥ ध्रु०॥
चतुरानन शेषादिक शिणले। वेदकदंबा मौन चि पडलें॥ १॥
रविशशि अनलाला भय आगळे। ज्या भययोगें यमवायु पळे॥ २॥
तो श्रीहरि भक्तीनें आकळे। व्यासादिक ग्रंथांतरिं वदले॥ ३॥
हें गुज प्रऱ्हादानें कथिलें। भक्तिस नारायण मन वळलें॥ ४॥

### पद २४ वें.

सच्चित्सुख हरि नाना रूपें धरुनि लीला करी।
नमन त्या धुंडिराज हा करी॥ ध्रु०॥
( चाल ) तो आहे म्हणुनी "सत्" साधू कथिती।
निजरूपा जाणे म्हणुनी "चित्" वदती।
निजरूपीं प्रीती म्हणुनी "सुख" म्हणती।
सच्चित्सुखघन समरस मग्न श्रीहरि लीला करी।
कळेना श्रुति हि वदे या परी॥ १॥
दिक्कालादिक व्यापुनि राही अनंत तो श्रीहरी।
वर्णितां शेष हि मौना धरी।
( चाल ) तो दिशा होउनी अवकाशातें वरी।
अवकाश होउनी दिशांस तो सांवरी।
तो काल होउनी वरि घटिका नोवरी।
पल निमिषादिक होउनी त्यांचीं सुपुत्ररत्नें वरीं।

मनोहर हरि तो क्रीडा करी ॥ २ ॥
भू-जल-तेज-पवन-गगन हीं रूपें नाना धरी ।
करितो अनुपम लीला हरी ।
( चाल ) विस्तीर्ण गगनमंडपा उभारून ।
दीपन व्यवस्था अग्नीतें देउन ।
विणवून विविध तृणपटा जलाकडुन ।
प्रभा चंद्रिका लतिका नारी रवि शशि तरु नरहरी ।
होउनी मंडपिं लीला करी ॥ ३ ॥
निर्जरांत हरि, हरि वनांत, हरि तरुवरि, हरि समरीं
व्यापुनी राही सकलां हरी ।
( चाल ) सुररक्षण करण्या असुरां मथि तो हरी ।
वनगजयूथा संहरि तो ही हरी ।
इंद्र चंद्र मर्कट अश्वां नांव असे कीं हरी ।
भूचर खेचर जलचर वनचर सुर मुनि नर नारी ।
भासती सर्व हि हे हरिवरी ॥ ४ ॥

## पद २५ वें.

सोड सोड सोड गड्या विषयसंग रे ।
निशिदिनिं तूं हरि भजनीं, होइं दंग रे ॥ ध्रु० ॥
शैशव तूं क्रीडनांत दवडिशी सदा ।
यौवनांत येत असे ऊत दुर्मदा ।
वृद्धपणीं कायिक बहु होति आपदा ।
म्हणुनि चिरसुखार्थ ईशपदीं रंग रे ॥ १ ॥
शाश्वत जगिं कांहीं नसे उमज तूं मनीं ।
उदासीन कामरहित विचर तूं जनीं ।
सतत असो प्रेमा तव नंदनंदनीं ।
तरिच सहज होय त्रिविध ताप भंग रे ॥ २ ॥

### पद २६ वें.

हरये नमः हरये नमः हरये नमः ॥ ध्रु० ॥
कृष्ण यादवाय नमः ।
गोपाल, गोविंद, श्रीराम, मधुसुदन ॥ १ ॥
गोपाल, जगपाल, भूपाल, जगकंदन ॥ २ ॥
गोपाल, व्रजपाल, नंदलाल, खलवंदन ॥ ३ ॥
